(649)

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा ३/झोपुआ/ ८०८ /२०२४
दिनांक : १३/ २ /२०२४

झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेश (अंतिम)
महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये अंतिम आदेश

प्रस्तावना -

काळाखडक, वाकड येथील स.नं.१२४/१ अनुसूचीत नमूद केलेल्या क्षेत्रासंदर्भात महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) अंतर्गत खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करणेत येत आहेत.

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) मध्ये नमूद तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करणेकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे हे सक्षम आहेत; आणि,

(२) ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची दि.०५/१२/२०२३ रोजीची पूर्वसूचना प्रत्यक्ष जागेवर दि.१८/१२/२०२३ रोजी डकविण्यात आली असून दि.०८/१२/२०२३ रोजीच्या दैनिक लोकनायक व जनमंथन या स्थानिक वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग-१, पुणे विभागीय पुरवणी, डिसेंबर २१ ते २७, २०२३ मध्ये पृष्ठ क्र.१५ व १६ वर प्रसिध्द करण्यात आली आहे; आणि ,

(३) ज्याअर्थी, खालील अनुसूचीमध्ये,नमूद केलेली ही मिळकत महानगरपालिकेकडून झोपडपट्टी म्हणून घोषित नसली तरी सक्षम प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभाग,पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र. झोनिपु/०४/कावि/१२०/२०२०, दि.२९/१०/२०२० अन्वये सदर ठिकाणी सादर केलेला झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती असलेबाबतचा अहवाल व सक्षम प्राधिकारी क्र.३ झोपुप्रा, पुणे यांनी देखील दि.२८/०१/२०२२ रोजी स्थळपाहणी करून अहवाल स्वतंत्रपणे प्रकरणी दाखल केलेला आहे. ७/१२ नुसार एकूण ४६७००.०० चौ.मी. एवढे क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे; आणि,

(४) ज्याअर्थी, सदरची पूर्वसूचना प्रसिध्द करणेत येवून ३० दिवसांचा कालावधी पूर्ण झाला आहे. सदर पूर्वसूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे जागा मालक किंवा इतर यांना त्यांच्या ज्या काही सूचना/हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत या कार्यालयाकडे सादर करणेबाबत फर्माविण्यात आले होते. त्यानुसार सवित्रा सुरेश चौगुले व इतर ४ यांची ३(क) पूर्वसूचना मध्ये नमूद केलेप्रमाणे विहित मुदतीत हरकत प्राप्त झाली होती. उपरोक्त हरकतदार यांची जागा प्रस्तुत पुनर्वसन योजनेच्या क्षेत्राच्या बाहेर असलेमुळे त्यांनी सदर बाबत घेतलेली हरकत ग्राह्य धरता येणार नसलेने त्यांची हरकत निकाली काढणेत आलेली आहे; आणि,

(६) ज्याअर्थी, सदर क्षेत्रावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबतच्या संदर्भात कोणताही प्रतिबंधात्मक आदेश नसल्यामुळे व झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसंदर्भातील परिस्थिती अस्तित्वात असल्याने सदर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणूनघोषित करणेबाबत पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे; आणि,

(७) ज्याअर्थी, सदर योजनेकरिता अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीचे क्षेत्र ४६७००.०० चौ.मी. इतक्या क्षेत्राकरिता मिळकतीकरिता झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेश ३(क) अंतिम करणे क्रमप्राप्त आहे.

त्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमूद एकूण ४६७००.०० चौ.मी. एवढे योजना क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झाल्याने उपरोक्त परिस्थितीचे अवलोकन करता सदर अधिनियमातील कलम ३(क) च्या तरतुदीनुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश :-

(१) अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) अंतर्गत या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून अंतिमत: घोषित करण्यात येत आहे.

(२) सदरच्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, उक्त अधिनियमाच्या कलम ३क मधील तरतुदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे मुंबई ,येथे अपील दाखल करता येईल.

## अनुसूची

झोपडपट्टीचे नाव :- स.नं.१२४/१, काळा खडक, वाकड, जिल्हा- पुणे.
महानगरपालिका क्षेत्र :- पिंपरी चिचवड महानगरपालिका.

| ठिकाण - काळा खडक, वाकड | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| स.नं./ सि.स.नं. / फा.प्लॉ.क्र | जमीनीचे मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ. मी.) | योजना क्षेत्राची चतु:सिमा | | | |
| | | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| स.नं.१२४/१, काळा खडक, वाकड, पुणे | खाजगी | ४६७००.०० चौ.मी. | लागू स.नं.१२५ | लागू स.नं.१२९ | लागू रस्ता | लागू रस्ता ताथवडे ची शिव |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक :- १३ / ३ /२०२४.

13.3.24

(नीलेश गटणे) (भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत-

१. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे. - यांना माहितीस्तव सादर.
२. व्यवस्थापक, मुद्राणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६- यांना शासकीय राजपत्रात प्रसिद्धीसाठी अग्रेषित.
३. विकसक मे. जय एंटरप्रायजेस - यांना पुढील कार्यवाहीस्तव रवाना.